# प्रसिध्दीपत्रक

मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत माहे, फेब्रुवारी - २०१४ साठी कौटुंबिक शिधापत्रिकेवर देय असलेल्या नियंत्रित शिधाजिन्नसांचे परिमाण व दर पुढीलप्रमाणे आहेत.

---

१. <u>प्राधान्य कुटुंब</u> - राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंबातील लाभार्थी असे शिक्के मारलेल्या शिधापत्रिकेवर वितरीत करावयाच्या धान्याचे परिमाण प्रति व्यक्ति २ किलो तांदूळ, रु. ३.०० प्रतिकिलो व ३ किलो गहू, रु. २.०० प्रतिकिलो, असे आहे.

२. अंत्योदय - अंत्योदय अन्न योजनेचे लाभार्थी असे शिक्के मारलेल्या प्रत्येक शिधापत्रिकेवर वितरीत करावयाच्या धान्याचे परिमाण प्रतिमाह एकूण ३५ किलो असून त्यापैकी २५ किलो तांदूळ रु. ३.०० प्रतिकिलो व १० किलो गहू, रु. २.०० प्रतिकिलो, असे आहे.

३. <u>साखर</u> - दारिद्र्य रेषेखालील पिवळ्या शिधापत्रिकाधारकांसाठी माहे फेब्रुवारी, २०१४ करिता साखरेचे मासिक परिमाण दरमाणशी ५०० ग्रॅम साखर रु. १३.५० प्रतिकिलो, असे आहे. ज्या पिवळ्या शिधापत्रिकाधारकांना माहे जानेवारी -२०१४ चा साखरेचा कोटा मिळाला नसेल, त्यांना तो कोटा माहे फेब्रुवारी, २०१४ मध्ये घेता येईल.

४. <u>केरोसीन</u> - शासन पत्र दिनांक ५ ऑगस्ट, २००५ अन्वये आश्वासित केरोसीन योजना राबविण्यात आली असून, त्यानुसार माहे फेब्रुवारी, २०१४ करिता मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात परिमंडळनिहाय आरंभीची शिल्लक ४१४.२२० कि.लि. व माहे फेब्रुवारी, २०१४ करिता शासनाकडून प्राप्त नियतन १२५४० कि.लि. असा एकूण उपलब्ध होणारा (३४.९१%) केरोसीन कोट्यानुसार शिधापत्रिकांवरील देय केरोसीन पुढीलप्रमाणे आहे.

## केरोसीनचे परिमाण

| आश्वासितप्रमाणे शिधापत्रिकाधारकांना देय परिमाण (लिटर) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एक गॅसधारक | बिगर गॅसधारक | | | | | | |
| | १ व्यक्ती | २ व्यक्ती | ३ व्यक्ती | ४ व्यक्ती | ५ व्यक्ती | ६ व्यक्ती | ७ व्यक्ती व वरील |
| २ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

## केरोसिनचे दर

मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील मुंबई विभागासाठी (मुंबई शहर व मुंबई उपनगर) या कार्यालयाची अधिसुचना क्र. निशि/केरो/२०१४/सहा/जा. २८ दि. ०८.०१.२०१४ नुसार केरोसीनचा किरकोळ दर प्रती लिटर रु. १५.२९ असा आहे.

ठाणे विभागासाठी ठाणे जिल्हाधिकारी यांनी ठरवून दिलेल्या दरानुसार उप नियंत्रक शिधावाटप, 'फ' परिमंडळ यांनी त्यांचे पत्र क्रमांक फप/केरो/२०१४/कावि.४९/जा.३२६, दिनांक १० जानेवारी, २०१४ नुसार केरोसीनचे दर पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | शिधावाटप कार्यालय | क्षेत्र | दर |
|---|---|---|---|
| १. | ठाणे विभाग (३६/फ, ४१/फ, ४८/फ) | ठाणे म.न.पा. क्षेत्र | १५.५० |
| २. | ४१/फ वाशी | नवी मुंबई मनपा क्षेत्र, वाशी व इतर | १६.७२ |
| ३. | ४१/फ भाईंदर | मिरा भाईंदर म.न.पा. क्षेत्र | १५.५४ |
| ४. | ३८/फ कल्याण | कल्याण डोंबिवली म.न.पा. क्षेत्र | १५.६० |
| ५. | ३९/फ डोंबिवली (मु) व (उ) | कल्याण डोंबिवली म.न.पा. क्षेत्र वगळून | १५.४६ |
| ६. | ४०/फ उल्हासनगर | उल्हासनगर म.न.पा. क्षेत्र | १५.६५ |
| ७. | ४०/फ (उप) उल्हासनगर | | |
| ८. | ४६/फ (अंबरनाथ), ४६/फ (बदलापूर) | उल्हासनगर (बिगरजकात क्षेत्र) अंबरनाथ | १५.५१ |
| ९ | ३७/फ भिवंडी | म.न.पा. क्षेत्र | १५.५६ |
| १०. | | म.न.पा. क्षेत्र वगळून | १५.४१ |

शासनाकडून प्राप्त होणारे मासिक नियतन, दर अथवा परिमाणात बदल झाल्यास त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

---

क्र. निशि/पायाणी/१०२०१४/दोन/जा. ७१५
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
एक्सप्रेस इमारत, २ रा मजला,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : १२/०२/२०१४

प्रति,

महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांस वरील वृत्तास व्यापक प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह सस्नेह अग्रेषित.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रत माहितीस्तव अग्रेषित :-

१. मा. राज्यमंत्री, अनापु व ग्रासंवि आणि साबांवि, मंत्रालय, मुंबई.
२. मा.खासदार, सर्व मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्र, ( संबंधीत परिमंडळामार्फत )
३. मा.आमदार, सर्व मुंबई /ठाणे शिधावाटप क्षेत्र, ( संबंधीत परिमंडळामार्फत )
४. मा.महापौर, मुंबई, नवी मुंबई, ठाणे,कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, मिरा-भाईंदर महानगरपालिका (संबंधीत परिमंडळामार्फत)
५. मा.आयुक्त, महानगरपालिका, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, मिरा-भाईंदर महानगरपालिका (संबंधीत परिमंडळामार्फत )
६. मा.नगराध्यक्ष. अंबरनाथ, बदलापूर. ( संबंधीत परिमंडळामार्फत )
७. उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, ४२ सर वि.ठा.मार्ग, मुंबई
९. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.२२ व २८ अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
१०. पर्यवेक्षक अधिकारी, श्रम मंत्रालय,७१ बी श्रम साफल्य, एन.जी.आचार्य मार्ग, चेंबूर, मुंबई ७१.
११. रेशनिंग कृती समिती, आर.एच.४, सी-४, लेन-८, सेक्टर-९, सी.बी.डी., बेलापूर, नवी मुंबई-४००६१४
१२. श्री. रेडकर संघटक, घरकाम मोलकरीण संघटना, भुपेश गुप्ता भवन, ८५-सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई.
१३. घरकाम मोलकरीण संघटना, मुंबई जिल्हा अंधेरी, घन:श्याम पाटील चाळ,एस.व्ही.रोड,अंधेरी (प), मुंबई-५८
१४. विशेष कार्यकारी अधिकारी, कामगार आयुक्तांचे कार्यालय, कामगार भवन, सी-२०, ई ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू), मुं-५१.
१५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सह.पणन महासंघ मर्या.,कनमूर हाऊस, नरसी नाथा स्ट्रीट, मुंबई.
१६. संदीप सुमन,रेशनिंग व जिविका हक्क संघटना, नवीन बी.डी.डी. चाळ नं. १५/५६, महात्मा ज्योतीबा फुले मार्ग, नायगाव, मुंबई -१४.

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित :-

१. उपनियंत्रक शिधावाटप, सर्व परिमंडळ कार्यालये.
२. उप संचालक (गो), संचालनालय नागरी पुरवठा (गो/वा), पुरवठा भवन, परेल, मुंबई.
३. शिधावाटप अधिकारी, सर्व शिधावाटप कार्यालये.
४. सर्व संघटित संस्था, (परिमंडळ कार्यालयामार्फत.)
५. कार्यासन अधिकारी, का.क.३ (साखर), ५ (दक्षता), ६ (केरोसिन), ११ (प्रशासन), हेल्पलाईन, नियंत्रण कक्ष, प्रधान कार्यालय.